सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# शहरात रामनवमीचा उत्साह!



श्रीराम नवमीनिमित्त रविवार (दि ६) रोजी शहरात उत्साह दिसून आला. सर्वत्र जल्लोष अन् राम नामाचा गजर सुरु होता. ढोल-ताशे, डिजेसह पारंपारिक लेझिमसह ठिकठिकाणाहून मिरवणुक काढण्यात आली. श्री राम मंदीरांमध्ये महाआरती करण्यात आली. श्री राम मंदीरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. ( छाया- किरण खानापुरे / जावेद तंबोली)

## युवा आदर्श

### पोखरण ...

हिंदुस्थान शक्तीमान
बदलले ते व्याकरण
दाखवली मुसद्देगिरी
राजस्थानी पोखरण
हादरले अवघे विश्व
प्रगत दिशा संक्रमण
कानोकान खबर ना
अलौकिक उदाहरण
जयकार तिरंग्याचा
स्तुती फुला पखरण
उत्तुंग लाभले सुयश
नभात ध्वजारोहण
अणुस्फोटी दणका
शक्तिमाता जागरण
नव विश्वा गृहप्रवेश
बांधी विजयी तोरण
बाजपाई कलामजी
शास्त्रज्ञांची आठवण
देत राही नवीनउर्जा
युगयुगे ही साठवण
ऐक्य शक्तीचे दर्शन
दूर ठेवी राजकारण
शांत तरी बलशाली
कधी न हो विस्मरण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# भूमाफिया व खंडणीखोरांवर कारवाई करु - नोपाणी

## जालना क्रेडाई आयोजित बांधकाम व्यावसायिकांशी संवाद परिसंवादात स्पष्ट भूमिका

**जालना । प्रतिनिधी -** भूमाफिया, खंडणीखोर आणि जमिनीवर बेकायदेशीर ताबा घेणाऱ्या प्रवृत्तीवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी येथे बोलताना दिला.

जालना क्रेडाईच्यावतीने शनिवार दि. ५ एप्रिल रोजी आयोजित बांधकाम व्यावसायिकांशी संवाद या परिसंवादात ते बोलत होते. ते म्हणाले की, क्रेडाई ही बांधकाम व्यवसायिकांची देशातील अग्रगण्य अशी व्यावसायिक संघटना आहे. काम करत असताना आपण कायदेशीर बाबीची पूर्तता करून व उत्कृष्ट असे बांधकाम करून सर्वसामान्यांचे स्वप्न आपण साकार करतात. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभूत गरजापैकी निवारा आपण उपलब्ध करून देतात व सोबत मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देतात. हे करत असताना आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी काही प्रवृत्ती समाजामध्ये टपून बसलेले असतात आणि म्हणून अशा व्यक्तींचा कायदेशीर मार्गाने आपण या ठिकाणी बंदोबस्त करू शकतो. बांधकाम व्यवसायिकांनी कायदेशीर बाबीची पूर्तता करून मगच आपले काम सुरू करावे कामांमध्ये गुणवत्ता दर्जा हा चांगला ठेवल्यास निश्चितच आपला व्यवसाय वृद्धिंगत होईल. पोलीस प्रशासन आपल्या दारी' हा उपक्रम जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबवला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. शाळांमधून मुलींना स्व-संरक्षणाचे धडे दिले जात आहेत, हेही त्यांनी नमूद केले. समाजामधील अपप्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यासाठी आपण संघटितपणे काम करू शकतो. त्यामुळे संघटनेच्या माध्यमातून तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.




या संवाद कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय कुलकर्णी म्हणाले की, जेव्हा जेव्हा क्रेडाई जालना सदस्यांच्या समस्या घेऊन नोपाणी साहेबांकडे गेलो, तेव्हा त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून तत्काळ उपाययोजना केल्या. पोलिस खातं आमच्या पाठीशी आहे याचा आम्हाला विश्वास वाटतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश भोसले यांनी केले. सूत्रसंचालन चेतन मराठे यांनी केले.

## भाजपा जिल्हा कार्यालयात स्थापना दिवस उत्साहात साजरा

# प्रत्येक भाजप कार्यकर्त्यासाठी राष्ट्रहित सर्वोपरि - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस आज दि.०६ एप्रिल २०२५ रोजी साजरा करण्यात आला, यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करून बैठकीचे आयोजन केले होते. श्रीराम नवमी निमित्त भगवान श्री रामाच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून आशीर्वाद घेतले व भारत माता, श्यामा प्रसाद मुखर्जी व पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेश पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी रावसाहेब दानवे यांनी पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, ६ एप्रिल भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिवस आहे. देशामध्ये भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान सुरु आहे या अभियानांतर्गत भाजपचे १.५ कोटी सदस्य हा अभिमानाचा टप्पा पूर्ण झाला आहे. देशामधील सर्व कार्यकर्ता हर्षोल्लासामध्ये पार्टी स्थापनेचा दिवस उत्साहाच्या वातावरणात साजरा करत आहे आणि पक्षाच्या विचारधारे प्रति संकल्पित होऊन कार्य करतात. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वात गरीब, किसान, अनुसूचित जाति, अनुसूचित जनजाति, मागासवर्ग कल्याणासाठी अनेक ऐतिहासिक



कार्य करीत आहे, देश विकसित करण्याचा भारताचा संकल्प साकार होताना दिसत आहे आणि पूर्ण देश मोदीमय होत आहे, तसेच श्रीराम नवमी निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मजबूत संघटनासाठी ऑनलाइन कार्यकर्ता संमेलनात सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाग घेतला. यामध्ये एकाच वेळी १२ लाख कार्यकर्ते या संवादात सामील होते. मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे **पान २ वर**

# कत्तलखाने व उघड्यावरील मांस विक्री बंद ठेवण्याची मागणी



**भोकरदन । प्रतिनिधी -** भगवान महावीर जयंती व हनुमान जन्मोत्सव या दिवशी भोकरदन शहरातील कत्तलखाने व उघड्यावरील मांस विक्री बंद ठेवण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की रविवार (६) रोजी श्रीराम नवमी उत्सव गुरुवार (१०) रोजी श्री भगवान महावीर जयंती उत्सव तसेच शनिवार (१२) रोजी श्री हनुमान जन्मोत्सव भारतात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत असतो. भोकरदन तालुक्यात व शहरामध्ये सुद्धा सदर उत्सव भव्य प्रमाणात हिंदू व जैन बांधव साजरा करणार आहे. या उत्सवाच्या दिवशी कत्तलखाते व उघड्यावर होत **पान २ वर**

## संपादकीय

# वक्फ बिल मंजूर त्याचे स्वागत, त्यापेक्षा अधिक संपत्ती राजकीय पुढाऱ्यांजवळ; त्याचे काय?

वक्फ बोर्ड दुरूस्ती विधेयक लोकसभेपाठोपाठ राज्यसभेतही विधेयकाला मंजुरी मिळाली आहे आणि आता राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे याचे स्वागतच. असे सांगितले जाते की देशात रेल्वे जवळ ३३ लाख एकर जमीन आहे. त्याखालोखाल १७ लाख एकर जमीन संरक्षण विभागाची आहे व तिसऱ्या क्रमांकावर ४ लाख एकर जमीन वक्फ बोर्डची आहे म्हणजेच वक्फ बोर्ड हे भारतातील सशस्त्र दल आणि भारतीय रेल्वे नंतर तिसरे सर्वात मोठे जमीनधारक आहेत. भारतात ३० वक्फ बोर्ड असल्याचे सांगितले जाते. एकूण मालमत्तेपैकी वक्फ बोर्डजवळ स्थिर मालमत्तांची संख्या ८.७२ लाख इतकी आहे तर जंगम मालमत्तांची संख्या १६ हजार इतकी आहे आणि या संपूर्ण मालमत्तेचे एकूण मूल्य १.२ लाख कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते.ही बाजू झाली वक्फ बोर्डाच्या संदर्भातील.दुसरीकडे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात जळलेल्या नोटांचा आकडा १५ कोटींच्या जवळपास असल्याचे सांगण्यात आले होते.त्याच धर्तीवर न्यायपालिकेमध्ये पारदर्शकता असावी या उद्देशाने देशाच्या सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयाच्या ३० विद्यमान न्यायमूर्तींनी आपल्या संपत्तीची माहिती न्यायालयाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे याचे मी मनापासून स्वागत करतो.त्याचप्रमाणे देशाच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी सुध्दा देश हिताच्या दृष्टीकोनातून आपली संपत्ती सरकारच्या माध्यमातून सार्वजनिक करावी असे मला वाटते.परंतू देशात अल्पावधीत राजकीय पुढारी करोडपती होतात त्यांचे काय? यांच्यावर बारकाईने लक्ष कोण देणार?आज देशात हजारोंच्या संख्येने आजी- माजी,आमदार- खासदार-मंत्री आहेत या सर्वांजवळ मोठ्या प्रमाणात चल-अचल संपत्ती आहे ही जर एकत्र केली तर हजारो कोटींची संपत्ती एका दिवसात सरकारच्या तिजोरीत येवू शकते यालाही नाकारता येत नाही. देशातील राजकीय पुढाऱ्यांनी हजारो गुन्हेगारांनी प्रवृत्तीचे,भुमाफीया, तस्कर,खंडणी वसूल करणारे, भ्रष्टाचार करणारे, वाळू माफिया इत्यादी अनेक गुन्हेगारांना खतपाणी घालण्याचे काम हेच राजकीय पुढारी करीत असतात यांची दहशत एवढी असते की गरीब व सर्वसामान्य व्यक्ती काहीच करू शकत नाही.तेव्हा हे लोक अल्पावधीत करोडपती झालेले दिसुन येतात.याकडेही सरकारने लक्ष देण्याची नितांत गरज आहे. हा अत्यंत महत्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे.कारण आमदार -खासदार -नगरसेवक- जिल्हापरिषद सदस्य इत्यादींचा कालावधी हा फक्त पाच वर्षांचा असतो.नंतर पुन्हा निवडून आले तर पुन्हा त्या पदावर विराजमान होतात. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपण या राजकीय पुढाऱ्यांचा विचार केला तर हे संपूर्ण पुढारी पाच वर्षांत करोडपती होतात हि बाब आश्चर्यजनक नाही का?त्यामुळे गरीब, शेतकरी व सर्वसामान्यांनपुढे प्रश्न उपस्थित होतो की यांच्या जवळ नोटा छापण्याची मशिन आहे की काय असे वाटते!आज आपण मंदिर प्रशासन,वक्फ बोर्ड,रेल्वे प्रशासन,पर्यटन स्थळे,सुरक्षा विभाग किंवा अन्य विभाग यांच्या संपत्तीच्या तुलनेत विचार केला तर एवढी संपत्ती या संस्थांना जवळ नसेल तेवढी संपत्ती आज आपल्या देशातील ८० टक्के आजी-माजी, आमदार-खासदार-मंत्री-नगरसेवक-जिल्हा परिषद सदस्य इत्यादींची चल अचल संपत्ती एकत्र केली तर वफ्त बोर्ड किंवा अन्य विभागापेक्षाही कितीतरी पटीने जास्त संपत्ती असल्याचे आपणा सर्वांना दिसून येईल आणि ही संपत्ती एवढी आहे की देशाला १० वर्षे कोणाहीजवळुन कर्ज सुध्दा घेण्याची गरज भासणार नाही.आज देशात बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां ज्या दिसुन येतात त्याची मुख्य जड म्हणजे देशातील ८० टक्के आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी डांबुन ठेवलेल्या पैशांमुळे निर्माण झालेली ही गंभीर अवस्था आहे. आज राजकीय पुढाऱ्यांचा पैसा चलनात रहाला असता तर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या किंवा मुलभूत समस्या या मुळातच उद्भवल्या नसत्या.देशाचे भविष्य उज्ज्वल करायचे असेल तर देशातील आजी-माजी, आमदार- खासदार-मंत्री किंवा अन्य राजकीय पुढारी यांनी आपली वाजवीपेक्षा जास्त असलेली संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करावी जेणेकरून देशांच्या उत्थानासाठी या पैशांचा सदूपयोग होईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ वाजवीपेक्षा जास्त असलेली संपत्ती एकत्र केली व ती जर सरकारी तिजोरीत जमा केली तर देशाचे भविष्य उज्ज्वल होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मी महामहीम राष्ट्रपती,उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालय यांना विनंती करतो की आपल्या मार्फत इतर संस्थांनांच्या संपत्तीची माहिती सरकार ठेवते याचे स्वागतच. परंतु सोबतच देशातील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपूर्ण संपत्ती माहिती एकत्र करून वाजवीपेक्षा जास्त असलेली संपत्ती किंवा वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत आणने आज काळाची गरज आहे. याकरीता सरकार अवश्य पुढाकार घेईल असे मला वाटते. जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## शास्त्रज्ञ डॉ शंकर भिसे गौरव व्हावा

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ. असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिर्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं. या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्येपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# बालवयातच कलात्मक धोरण अवलंबून सामाजिक बांधिलकी जपणारी कलावंत ईश्वरी रविंद्र लोहोटे !



ईश्वरी रवींद्र लोहोटे एक कलागुणसंपन्न नृत्यांगना आणि गोड गळ्याची गायिका. जणू काही वैखरीवर सरस्वतीचा वास आहे की काय असं भासणारी गोड गळ्याची गायिका म्हणजेच ईश्वरी. आतापर्यंत ईश्वरीने अनेक गायन आणि नृत्य स्पर्धेत सहभागी होऊन अव्वल नंबर मिळवून अनेक पुरस्कार संपादन केले आहेत. तिच्या या कलेचे मुंबईतूनच नव्हे तर महाराष्ट्रातून देखील कौतुक होत आहे. ईश्वरीने आपल्या कला कारकीर्द मध्ये विविधांगी कार्यक्रम केले असुन त्यांत एकेरी गायन स्पर्धा, ग्रीटिंग कार्ड बनविणे, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, समूह गायन स्पर्धा अशा अनेकविध कार्यक्रमांचा समावेश आहे. ईश्वरीने आतापर्यंत अशा अनेक स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. शालेय शिक्षण पूर्ण करता करता आपली आवडही जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न ईश्वरीने केला आहे आणि आजतागायत ती करत आहे. आपली गायनकला आणि नृत्यकला अंगीकारत असताना ईश्वरीला सामाजिक कार्याची आवड देखील तितकीच महत्वाची वाटते. मग त्यासाठी अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमात जाऊन गोरगरिबांना फळे वाटप, अन्नधान्य वाटप करत समाजोपयोगी कार्याची जाणीव ठेवली आहे. आणि एक बाल सामाजिक कार्यकर्ती म्हणून ईश्वराची गणना होते. आजवर ईश्वरीचे अनेक सेवाभावी संस्थेने कौतुक करून तिचा यथासांग सन्मान केला आहे त्यात प्रामुख्याने जनजागृती सेवा समिती, बदलापूर, साप्ताहिक भगवे वादळ, त्याचबरोबर तिच्या दैदिप्यमान कार्याची दखल घेऊन आर्यारवी एंटरटेनमेंट प्रॉडक्शनच्या तिसऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव मध्ये तिला नुकताच कलाभूषण हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बालवयातच कलात्मक धोरण अवलंबून सामाजिक बांधिलकी जपणारी ईश्वरी ही एक गुणी आणि हरहुन्नरी कलावंत आहे.

## मक्काच्या गंजीला आग; शेतकऱ्याचे नुकसान

### नुकसान भरपाई देण्याची मागणी

**भोकरदन** -तालुक्यातील नळणी खुर्द येथील शेतकरी रावसाहेब वराडे यांच्या शेतामधील दोन एक्कर मक्काला गंजीला लागलेल्या आगीमुळे मोठे आर्थिक नुकसान झाले असून या शेतकर्याला तात्काळ मदत देण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे भोकरदन उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी केली आहे.



नळणी येथील शेतकरी रावसाहेब धोंडीबा वराडे यांची २ एक्कर शेतामधील मक्याचा गंजीला लागलेल्या आगीत शेतकर्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान आहे. त्यामुळे आज शिवसैनिक व उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे यांनी शेतात जावून पाहणी करुन शेतकर्याला धीर देत झालेल्या नुकसानीचा मोबदला शासनाने तात्काळ देण्याची मागणी केली आहे.

# चक्रवर्ती सम्राट अशोक यांचा २३२९ वा जयंती महोत्सव उत्साहात

**बोरघर । माणगांव । प्रतिनिधी** - महाकारुणिक तथागत गौतम बुद्धांने या भारत देशाला समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, करुणा मैत्री प्रस्थापित करणारा बौद्ध धम्म देऊन विषमतावादी व्यवस्थेचे उच्चाटन केले ही जगातील सर्वात पहिली महान धम्मक्रांती होती, या बौद्ध धम्माला तत्कालिन स्थितीमध्ये राजा बिंबीसार, प्रसेनजित, आजातशत्रू, कनिष्क, हर्षवर्धन इत्यादी अशा महान राजांच्या माध्यमातून बौद्ध धम्माला राजाश्रय प्राप्त झाला त्यामध्ये तुलनात्मक इतिहासाचे अवलोकन केले तर या देशामध्ये चक्रवर्ती देवानांप्रिय प्रियदर्शी सम्राट अशोक यांच्या राजवटीत बौद्ध धम्माला फार मोठी चालना आणि राजाश्रय प्राप्त झाला त्यामुळे बौद्ध धम्म हा जागतिक कीर्तीचा धम्म म्हणून संपुर्ण जगात प्रसारित झाला.

अशोकाने या देशात जवळपास ८४००० स्तूप, लेणी, शिलालेख निर्माण केले. त्या इतिहासाची साक्ष आजही २००० वर्षानंतर आपल्याला पाहायला मिळत आहेत, मात्र अशा या महान सम्राटाचा इतिहास आज विस्मृतीत जाता कामा नये, येणाऱ्या पिढीला सम्राट अशोकाचा इतिहास जिवंत ठेवण्याची जबाबदारी ही आपल्या सर्वांची आहे, या अनुषंगाने दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्धमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या माध्यमातून सम्राट अशोक यांचा २३२९ वा जयंती महोत्सव अनंत गोपाळ मोरे यांच्या अध्यक्षते खाली साजरा करण्यात आला.

या प्रसंगी मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन करण्यात आले, सुत्रपठण अनिषजी येलवे, आयु. नरेशजी मोरे, जे के गायकवाड गुरूजी यांनी केले.



सम्राट अशोक यांच्या कार्यप्रणालीचा इतिहास वसंत कासारे यांनी मांडला, या जयंतीसाठी भारतीय बौद्धमहासभा अध्यक्ष रामदास शिंदे व त्यांची संपूर्ण कार्यकारिणी उपस्थित होते, त्याचप्रमाणे बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा व उपशाखा यांची कार्यकारिणी उपस्थित होती, तसेच तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा महिला विभाग अध्यक्षा सुषमा शिंदे व त्यांची कार्यकारिणी उपस्थित होती, त्याचप्रमाणे धम्मप्रिय बंधू भगिनी उपस्थित होते, या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र शेलार यांनी केले.

## पान १ वरुन

### प्रत्येक भाजप ...

यांचे ऑनलाइन मार्गदर्शन झाले.

भाजपा स्थापना दिनानिमित्त भाजपाच्या वतीने पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, आघाडी-मोर्चा अध्यक्ष व संयोजक तसेच शक्ती केंद्र प्रमुख व बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी पक्षाचा ध्वज लावून मिठाई, साखर पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, प्रदेश सदस्य राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, विमलताई आगलावे, सोपान पेंढाकर, सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलीये, अशोक पांगारकर, सुनील आर्दड, अर्जुन गेही, सौ.संध्याताई देठे, शुभांगी देशपांडे, रवींद्र अग्रवाल, अरुणाताई जाधव, वसंत शिंदे, सुनील खरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### कत्तलखाने व ...

असलेली मांस विक्री दुकाने बंद ठेवावी अशी मागणी सुरेश शर्मा, गजानन तांदूळजे, भाजपा जैन प्रकोष्ठ चे मयूर बाकलीवाल ,प्रशांत मुळे, मनोज थारेवाल, दादाराव नवल,,बिरसोने, शंकर सपकाळ, यांच्यासह श्री राम जन्मोत्सव समितीच्या सदस्यांनी केली आहे.

## वाचकांचे मनोगत


# परप्रांतीयांना मराठीचे वावडे ,मराठी जनांनापण मराठीचे वावडे !

महाराष्ट्र राज्य स्थापन झाले ते मराठी भाषिक राज्य म्हणून. भाषावार प्रांत रचनेनुसार महाराष्ट्र राज्याची भाषा मराठी.६५ वर्षांत महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेचा वापर शासकीय कामकाजात करावा म्हणून अनेकदा शासन निर्णय आदेश पारित केले तरही मराठी भाषिक असलेल्या राज्यात 'मराठी 'भाषेचा आग्रह धरावा लागतो हे दुर्दैव.

महाराष्ट्रात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना याच साठी केली.शिवसेना अंगीकृत स्थानीय लोकाधिकार महासंघ स्थापन करुन केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, निमशासकीय आस्थापनांमध्ये ८० % टक्के मराठी स्थानीक उमेदवारांना नोकरीत स्थान देण्यात यावे ही मागणी मान्य करुन घेतली.सुधीर (भाऊ) जोशी,गजानन कीर्तिकर यांनी लोकाधिकार समिती महासंघाचे धोरण केंद्र सरकारच्या बँका,आयकर खाते,पोस्ट आणि तार खाते,तेल कंपन्या,दोन्ही मार्गावरील मध्य रेल्वे,पश्चिम रेल्वे,एअर इंडिया,पोर्ट ट्रस्ट, आयुर्विमा इत्यादी अनेक शासकीय, निमशासकीय कार्यालयातील नोकरीत भरतीत मराठी उमेदवारांना रोजगार मिळवून दिले.परप्रांतीय लोक मराठी भाषा उत्तम बोलणारे आहेत.पण आमचे मराठी भाषिक असून हिंदी,इंग्लिश, गुजराती भाषेत बोलून कोणाचा अपमान करीत आहेत याचे त्यांना भान नाही .शिवसेना संघटना मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी ५६ वर्षे लढली,शिवसेनेने लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून दिले याचा विसर पडला म्हणून की काय हाच मराठी माणूस शिवसेना सोडून जाताना दिसतो तेव्हाच परप्रांतीयांचे महत्त्व महाराष्ट्रात वाढीस लागत आहे.अजून वेळ गेलेली नाही .शिवसेनाप्रमुखांची धोरणे आजूबाजूच्या राज्यांनी अमलात आणली आहेत. तामिळनाडूतील हिंदी भाषेला विरोध, कर्नाटक सरकारने आपल्याच भाषिकांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.महाराष्ट्रातील मराठी नेते याचा बोध घेतील काय ?आंदोलने करुन, मारझोड करुन मराठी भाषा किती परप्रांतीय बोलतील, सरकारनेच मराठी भाषेच्या बाजूने ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे.७५ वर्षाच्या प्रदीर्घ लढ्यानंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असे असतानाच मराठीत बोला म्हणून आंदोलन करावी लागतात हे योग्य वाटत नाही.महाराष्ट्र सरकारनेच मातृभाषेतून समन्वय साधण्यास बंधनकारक करावे.मराठी तरुण उमेदवारांना महाराष्ट्रातील शासकीय, निमशासकीय कार्यालयातील नोकरी दिली तर परप्रांतीय येणारच नाहीत. आज नोकरीतील परप्रांतीय उमेदवारांचा परिणाम मराठी उमेदवारांना भोगावा लागतो आहे.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**
**९८६९४७६२०९,** mahadeogolvaskargmail.com

## भाजपा स्थापना दिवस उत्साहात साजरा



**अंबड -** भारतीय जनता पार्टी स्थापनेला ४५ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त घनसावंगी मतदारसंघात भाजपा नेते सतीश घाटगे व माजी आमदार विलासराव खरात यांच्या प्रमुख उपस्थितीत अंबड व घनसावंगी शहरातील भाजपा जनसेवा कार्यालयात रविवारी भाजपा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच भाजपा कार्यकर्त्यांनी आपापल्या घरावर भाजपचा झेंडा फडकावून सेल्फी काढले.

अंबड येथील जनसेवा कार्यालयात भाजपाचे ज्येष्ठ नेते विलासबापू खरात, समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या हस्ते भाजपच्या ध्वज फडकवण्यात आला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते यांना पक्ष स्थापना दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यकर्ता संमेलनात ऑनलाईन पद्धतीने सहभागी होऊन सर्व भाजपा कार्यकर्त्यांनी संबोधन ऐकले. याप्रसंगी शिवाजी मोरे, प्रेमानंद उढाण, केदार राठी, डॉ. रमेश तारगे, रामेश्वर माने, किरण गुढेकर, ईश्वर धाईत, यांचासह घनसावंगी विधानसभेतील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# वटवृक्ष हनुमान मंदीर येथे जन्मोत्सव सोहळा आयोजित

**जालना । प्रतिनिधी -** दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील वटवृक्ष हनुमान मंदीरात दि. ५ ते १२ एप्रिलदरम्यान हनुमान जन्मोत्सव सोहळा आणि अखंड रुद्र जलधारा अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे.

गत २४ वर्षापुर्वी स्व. मोहन महाराज फुलंब्रीकर यांनी अखंड रुद्र जलधारा अभिषेकाची परंपरा सुरु केली होती. अंध्दश्रध्दा आणि अनिष्ठ रितीरिवाज निवारण्यासाठी या सोहळ्यात दरवर्षी रुद्राअभिषेक करण्यात येत असून, दिवसरात्र ११ ब्राह्मणांच्या माध्यमातून गणपती, महादेव, देवी, हनुमान पंचायतन करण्यात येते. विश्वशांती, जनकल्याण, नैसर्गीक आपत्ती निवारणार्थ या सप्ताहात समाजातील सर्वधर्मियांकडून सेवा केली जाते. दररोज सायंकाळी ७ वाजता प्रदोष पुजेचे आयोजन करण्यात आले असून, मुख्य यजमान ॲड. संजय देशपांडे, महिकोचे राजेंद्र बारवाले, सुरेश अग्रवाल, भास्करराव दानवे, अशोक पांगारकर, चक्रधर खोतकर, डॉ. संजय राख, डॉ. पद्माकर सबनीस, डॉ. निरज परीतकर, वैद्य मंगल शुक्ला, सत्यनारायण भारुका, भावेश पटेल, अरुण अग्रवाल, संजय अग्रवाल, जितेंद्र पित्ती, मदन लाड, भुपेश केनीया, संजय खिस्ते, ॲड. जगदीश बडवे, ॲड. बलवंत नाईक, ॲड. विष्णुपंत किनगावकर, किरण काळे, पुष्कर आंबेकर हे आहेत. तर वेशासं विनायक महाराज फुलंब्रीकर, वेशासं विजय महाराज फुलंब्रीकर, शलीकराम म्हस्के, अतूल वझरकर, अरविंद भोसले, दिनेश फलके, प्रल्हाद हरबक, श्रीनिवास इंदानी, महेश रत्नपारखी, धिरज मेवाडे, रुपेश हुंडीवाले, लक्ष्मीकांत नाईक, शंकर लुंगे, ॲड. ललीत हट्टेकर, आनंद मोहिते, संजय भालेराव, गणेश सुपारकर, सतीष लाड, मकरंद जहागीरदार, त्र्यंबक देशमुख, वेदांत फुलब्रीकर, संजय पातेकर यांचे सोहळ्यासाठी विशेष सहकार्य लाभत असल्याचे संयोजकांनी सांगितले.






## पक्षवाढीसाठी कार्यकर्त्यांनी परिश्रम घ्यावे - गृहराज्यमंत्री कदम



**घनसावंगी । प्रतिनिधी -** शिवसेना ही कार्यकर्त्यांच्या जोरावर उभी आहे, आपण सर्वांनी मिळून जनतेच्या कल्याणासाठी आणि पक्षाच्या वाढीसाठी अथक परिश्रम घ्यावयाचे आहेत त्यासाठी राज्य सरकारच्या विविध जनहितकारी योजना घरोघरी पोहोचवण्याचे आवाहन गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी केले ते शिवसेना संपर्क कार्यालय घनसावंगी येथे युवासेना, शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या संवाद मेळाव्यात बोलत होते. व्यासपीठावर आमदार हिकमतदादा उढाण , संपर्कप्रमुख पंडितराव भूतेकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ए जे.पाटील बोराडे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती पुढे बोलताना नामदार योगेश जी कदम म्हणाले की हा मेळावा युवासेना - शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण करणारा ठरला असून येणाऱ्या काळात पक्षाच्या कार्यांना अधिक गती मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आमदार हिकमदादा उढाण कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देताना म्हणाले की, शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता पक्षाचा आधारस्तंभ आहे, आपण एकत्र राहिलो तर कोणतेही आव्हान परतवून लावू शकतो यासाठी आपण सर्व प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत असे सांगितले.

कार्यक्रमास घनसावंगी तालुक्यातील सर्व युवासेना-शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# आयुष्यात चांगले नातेसंबंध, प्रेम, विनोदी वृत्ती ठेवाल तर समाधान हे मिळत राहील

## सुखाचा शोध विषयावर आयोजित व्याख्यानात मनोविकारतज्ञ डॉ. नंदु मुलमुले यांचा सल्ला

**जालना । प्रतिनिधी -** खूप पैसा, प्रसिद्धी, यश नव्हे समाधान हेच आयुष्याचे सार असून त्यासाठी आपल्या दैनंदिन कामात विनोदी वृत्ती जोपासावी, असा मौलिक सल्ला प्रसिद्ध मनोविकारतज्ञ तथा टीव्ही वाहिनीवरील मन सुद्ध तुझं' या मालिकेचे लेखक डॉ. नंदू मुलमुले यांनी दिला. जालना येथील मानस फाऊंडेशनच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त न्हावा चौफुलीजवळील मानस हॉस्पिटलच्या प्रांगणात शनिवारी सायंकाळी आयोजित केलेल्या 'शोध सुखाचा' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. दुर्वा सन्यासी व दिनेश सन्यासी यांच्या गाणे मनातले' या सुश्राव्य गायनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

अध्यक्षस्थानी अप्पर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी तर व्यासपीठावर डॉ. प्रकाश आंबेकर, उद्योजक सुनील रायठठ्ठा यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मुलमुले म्हणाले, अलीकडच्या काळात प्रचंड स्पर्धा वाढली असून पाल्यांकडून पालकांच्या अपेक्षा प्रचंड वाढल्या आहेत. यामुळे मुलांवर ताण येत असून ते नैराश्यात जात आहे. राजस्थानमधील कोटा हे कोचिंग सेंटर म्हणून देशभरात प्रसिद्ध आहेत मात्र याठिकाणी १५ दिवसात एक विद्यार्थी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे, जे गंभीर आहे. त्यामुळे अपेक्षा ठेवताना पाल्याच्या क्षमता ओळखल्या पाहिजे, त्याच्या आवडी-निवडी समजून घ्यायला हव्यात आणि सर्वात महत्वाचे म्हणून त्याच्याशी चांगला संवाद राहायला



हवा तरच अपेक्षित उद्दिष्ट साध्य होऊ शकते. शिवाय, एखादे उद्दिष्ट साध्य झाले तर माणूस सुखी होतोच असे नाही, त्यामुळे उद्दिष्टप्राप्तीकडे वाटचाल करताना विनोदी वृत्ती जोपासावी, मौज असावी तरच जीवनाचा प्रवास सुखकर होऊ शकतो असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

अध्यक्षीय समारोपात अपर पोलिस अधीक्षक नोपानी म्हणाले, मानस फाऊंडेशनने हाती घेतलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असून पोलिस प्रशासनसुद्धा त्यांच्यासोबत एकत्र येऊन किशोरवयीन तसेच तरुणांसाठी कार्यशाळा घेणार आहे. प्रास्ताविकात डॉ. अंबेकर यांनी गत चार वर्षात फाऊंडेशनकडून राबवण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली तसेच यात जालनेकरांचे सर्वांचे सहकार्य मिळत असल्याबद्दल आभार व्यक्त केले. डॉ. सुजाता देवरे यांनी पाहुण्यांचा परिचय, सुत्रसंचालन डॉ. सुहास सदावर्ते तर आभार कालींदा उढाण यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. शीतल आंबेकर , डॉ. यशवंत सोनुने, सतीश खरटमल, विनोद जैतमहाल, डॉ. वासुदेव उगले, डॉ. प्रणिता राठोड, अभय वाकडे आदींनी परीश्रम घेतले. यावेळी शहरातील वैद्यकीय, शिक्षण, व्यापार, उद्योग, साहित्य, प्रशासकिय आदी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# लॉ. मीनाक्षी दाड यांचा प्रांतीय परिषदेत अवॉर्ड देऊन सन्मान; प्रांतीय सहसचिवपदी निवड

**जालना । प्रतिनिधी -** गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या प्रांत ३२३४ एच २ च्या 'सेवार्पण' प्रांतीय परिषदेत जीएसटी समन्वयक लॉ. मीनाक्षी



विजय दाड यांचा सेवाभाव आणि कार्यक्षमतेबद्दल अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रांतपाल लॉ. गिरीश सिसोदिया, माजी इंटरनॅशनल डायरेक्टर लॉ. डॉ. नवल मालू, नियोजित प्रांतपाल लॉ. अश्विन बाजोरिया आणि फर्स्ट लेडी लॉयन संगीता सिसोदिया यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

विशेष म्हणजे इंटरनॅशनल डायरेक्टर लॉ. पंकज मेहता यांच्याहस्ते त्यांना सर्वोत्तम कार्यासाठी इंटरनॅशनल सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान त्यांच्या सामाजिक कार्यातील समर्पणाची दखल घेत देण्यात आला. या गौरवसोबतच आगामी वर्ष २०२५-२६ साठी लॉ. मीनाक्षी दाड यांची प्रांतीय सहसचिव या महत्त्वाच्या पदावर निवड जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या नेतृत्वगुणांना मिळालेली ही मोठी जबाबदारी आहे. या यशाबद्दल विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी मीनाक्षी दाड म्हणाल्या की, मिळालेला हा सन्मान केवळ माझा नाही, तर माझ्या सोबत निःस्वार्थपणे काम करणाऱ्या संपूर्ण टीमचा आहे. प्रांतातील प्रत्येक क्लबचा आहे. जीएसटी समन्वयक म्हणून काम करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवण्याचे कार्य क्लब च्या माध्यमातून झाले मी त्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आणि आज त्या सेवेला मिळालेली ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील दाद माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.पुढील वर्षा करीता निवडुन आलेले प्रांतपाल लॉ. अश्विन बाजोरिया यांनी माझ्यावर प्रांतीय सहसचिव पदाची जबाबदारी दिल्याबद्दल मी लॉयन्स प्रांत संघटनेचे आणि माजी प्रांतपाल लॉ. विजय बगडीया व लॉ. पुरुषोत्तम जयपुरिया यांचे मनःपूर्वक आभार मानते. हे केवळ पद नाही, तर समाजासाठी अधिक व्यापक आणि प्रभावी पद्धतीने काम करण्याची एक संधी आहे. सेवा हीच खरी साधना आहे, या तत्त्वावर विश्वास ठेवून मी पुढील काळातही निःस्वार्थ, समर्पित आणि परिणामकारक सेवा करत राहीन, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## कोल्हापूर येथील ग्राम संसद कार्यालयामध्ये जिवंत सातबारा मोहीम

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील कोल्हापूर गावातली ग्रामसंसद कार्यालय येथे शासनाने ठरवलेल्या जिवंत सातबारा ही मोहीम राबिण्यात आली आहे.

ही मोहीम महसूल विभागा मार्फत राबविली जाते. यामध्छे १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत दिनांक ०१ पासुन प्रत्येक जिल्ह्यात सर्व गावांमध्ये जिवंत सातबारा मोहीम राबविण्यात येत असून या मोहीमे अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदाराच्या वारसाच्या नोंदींची प्रक्रिया पूर्ण करायची आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेत जमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसाची नोंद विहित कालावधी त अधिकार अभिलेखांमध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते या दृष्टिकोनातून संपूर्ण राज्यात जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे. यावेळी या मोहिमे अंतर्गत कोल्हापूर ग्रॅम संसद कार्यालय येथे तलाठी इंगळे साहेब, सरपंच गजानन पाटील जाधव, शेतकरी प्रलाद पाटील जाधव, आमोल जाधव ,गुलाबराव जाधव, अर्जुन हिवाळे ,विठ्ठल जाधव व गावातील मडंळी उपस्थीत होते.

## जालन्यातील ८०० लाभार्थी अयोध्यासाठी रवाना

### भाजपा नेते रावसाहेब दानवे यांनी दाखवली हिरवी झेंडी




**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये अनेक तीर्थक्षेत्र आहेत. महाराष्ट्रात सर्वाधिक महान संत तसेच धर्मगुरु होऊन गेले आहेत. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची, भक्ती मार्गाची शेकडो वर्षांची परंपरा असून यात लाखो लोक धर्मकार्य, समाजकार्य भक्ती मार्गानं प्रवास करत असतात, याच पार्श्वभूमीवर राज्यातील वयोवृद्धांना तीर्थयात्रा करणं सुलभ आणि सोपं व्हावं यासाठी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत प्रवाशांना प्रवास मोफत असणार आहे.

याच योजनेअंतर्गत निवड केलेले जालना जिल्हयातील जवळपास ८०० लाभार्थी (राम भक्त) आज दि.०६ एप्रिल रोजी जालना रेल्वे स्थानकातून संध्याकाळी ७.०० वा प्रवासा करिता रवाना झाले आहेत, भक्तांच्या या सुखकर प्रवासासाठी माजी रेल्वे राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी आ.नारायण कुचे, बद्रीनाथ पठाडे, राजेश राऊत, सतीश जाधव, अर्जुन गेही, सिद्धिविनायक मुळे, शशिकांत घुगे, धनराज काबलीये, सुनील आरदड, स्टेशन प्रबंधक विनोद भारती, समाज कल्याण अधिकारी गीता कुटे आदींची उपस्थिती होती.

# सात दिवसांत चौकशी करून कारवाई

## इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनला उपअधिक्षक आयुष नोपाणी यांचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी -** हेल्मेट नाही म्हणून ऑनलाईन चलनच्या ऐवजी नगद रक्कम मागत अरेरावीची भाषा वापरल्याप्रकरणी वाहतुक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करत त्याचे निलंबन करण्यात यावे या मागणीसाठी शनिवार (दि ५) रोजी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे आमेर खान, सुनील भारती यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न डफडं बजाओ बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार होते मात्र, शनिवार (दि ५) सकाळीच नऊ वाजता पोलीसांचा मोठा फौजफाटा आंदोलनस्थळी दाखल झाला. कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने यांनी आंदोलनकांमध्ये मध्यस्थी करत पोलीस उपअधिक्षक आयुष नोपाणी यांची भेट घालून दिली.

आंदोलकाचे शिष्टमंडळ यांनी उपअधिक्षक श्री नोपाणी यांचे भेट घेत घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर श्री नोपाणी यांनी तातडीने येत्या सात दिवसात चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. पोलीस उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी यांना चौकशी करण्याचे निर्देश श्री नोपाणी यांनी दिले आहे. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले.

पोलीस उपअधिक्षक आयुष नोपाणी यांना भेट दिलेल्या शिष्टमंडळामध्ये इंडियन जर्नलिस्ट असोचे जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान, उपाध्यक्ष संदीप भारती, प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, नाजीम मनियार, बासित बेग, तरंग कांबळे, गणेश सातपुते यांचा समावेश होता.

दरम्यान, आंदोलन स्थगितीनंतर ओबीसीचे नेते नवनाथ वाघमारे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. पोलीसांनी वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश लावावा, जिल्ह्यात कायदा व सुव्यव्यस्थेचा प्रश्न निमर्ण होत असतांना काही पोलीस अधिकाऱ्यांमुळे पोलीसांचे नाव बदनाम होत आहे. पोलीसांनी अवैध वाळु उपसा, सट्टा, मटका, यावर लक्ष केंद्रीत करावे सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्या काही पोलीस अधिकाऱ्यांनी



आता पत्रकारांनाही त्रास देणे सुरु केले आहे या गंभीर विषयाकडे पोलीस अधिक्षक यांनी लक्ष द्यावे अशी मागणी श्री वाघमारे यांनी यावेळी केली.

नेताजी सुभाषचंद्र बोस सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रतन लांडगे यांनीही आंदोलनाला जाहीर पाठींबा दिला असून येत्या सात दिवसात पोलीसांनी योग्य ती कारवाई न केल्यास संघटनेच्यावतीने पत्रकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून लढा देणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी पोलीसांनी येत्या सात दिवसात चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले यावर समाधान व्यक्त केले आहे. त्याच बरोबरच चौकशी करतांना योग्य पद्धतीने चौकशी व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करत एकांगी चौकशी केल्या गेल्यास भविष्यात आमेर खान यांच्या आमरण उपोषणात कॉन्सीलचे जालना पदाधिकारी सहभागी होतील असा ईशाराही दिला.

यावेळी जावेद खान, लहू गाडे, सुयोग खर्डेकर, मुजीब शेख, आकाश माने, शिवाजी बावणे, सुनील नरोडे, शेख सलीम, विलास गायकवाड, रईस शेख, गणेश सातपुते, आरेफ सय्यद, मजहर सौदागर, गणेश जाधव, शब्बीर पठाण, लेवी निर्मल, सय्यद अफसर, अशपाक पटेल, नदीम सय्यद, श्रीपत नरेश, विकास बागडी, प्रेम जाधव, नरेंद्र जोगड, शेख शकील आदींची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.